# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि** १४/१०/२०२६

वैद्यकीय आरोग्य विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या इसमांचा शोध घेवून त्यांचेवर कारवाई करणेकरिता धडक मोहिम राबविणे अत्यंत गरजेचे होते. याबाबत मा. महापौर, वसई विरार शहर महानगरपालिका, मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका आणि मा. सभापती, आरोग्य समिती, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे मार्गदर्शन आणि निर्देशान्वये महानगरपलिका कार्यक्षेत्रात अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई करणेकरिता महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी यांची एकुण 5 पथके तयार करण्यात आली.

दिनांक 13 ऑक्टोबर 2026 रोजी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाने केलेल्या धडक कारवाईत, अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या 7 बोगस डॉक्टरांविरुद्ध कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये संतोषभुवन, नालासोपारा पूर्व परिसरात वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पांढरे आणि त्यांच्या पथकाने (डॉ. विक्रम राठोड, डॉ. कृपाली फर्डे, डॉ. रिद्धी पाटील, डॉ. तृप्ती कोकाटे आदींच्या पथकाने) एकुण 5 अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई केली.

या दरम्यान खालील व्यक्ती कोणतीही कायदेशीर पात्रता नसताना नागरिकांची तपासणी करून स्वतःकडे असलेली ॲलोपॅथिक औषधे व इंजेक्शन्स देताना आढळले:

संशयित आरोपी व त्यांचे दवाखाने:

1. सुकांता उपेंद्र नायक (वय 56) – लसावीर हेल्थ केअर सेंटर, बाळशेतपाडा, संतोषभवन, नालासोपारा पूर्व (बी.ई.एम.एस. पदवीची बतावणी करून विनापरवाना प्रॅक्टिस).
2. राकेश ब्रहमादीन उपाध्याय उर्फ वेदजी उपाध्याय (वय 45) – मेडीक्योअर पॅथॉलॉजी, श्रमिक नगर, संतोषभवन, नालासोपारा पूर्व.
3. अनिल रामदिन यादव (वय 51) – ओम साई हेल्थ केअर क्लीनिक, शॉप नं. ३१, संतोषभवन, नालासोपारा पूर्व.
4. दिनानाथ पंधारी यादव (वय 52) – जीवदानी हेल्थ केअर सेंटर, भक्ती धाम, संतोषभवन, नालासोपारा पूर्व (डी.ई.एच.एम. पदवी सांगून ॲलोपॅथिक प्रॅक्टिस).
5. प्रदिप कुमार पटेल (वय 45) – वैष्णवी हेल्थ केअर सेंटर, भक्ती धाम, संतोषभवन, नालासोपारा पूर्व.

तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदीश महाजन यांचे पथकाने वालीव, वसई पूर्व परिसरात धडक मोहिम घेवून एकुण 2 अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर कारवाई केली.

1. ब्रिजकिशोर रामलखन सिंग (वय 55) – डॉ. अमन क्लिनिक, सिद्धीविनायक चाळ, गाळा नं.03, वालीव, वसई पूर्व.
2. डॉ. अमन ब्रिजकिशोर सिंग - डॉ. अमन क्लिनिक, सिद्धीविनायक चाळ, गाळा नं.03, वालीव, वसई पूर्व. (महाराष्ट्र होमिओपॅथी कौसींल कडील नोंदणी नाही.)

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्यासाठी सदरचे धाडसत्र असेच सुरु राहणार असून नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, अशा अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांपासून सावध रहा. तसेच असे इसम आपल्या कार्यक्षेत्रात असल्यास याबाबत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, वैद्यकीय आरोग्य विभाग, सातवा मजला,

म्हाडा कॉलनी रोड, विरार (प.) येथे माहिती देण्यात यावी. आपण दिलेल्या माहितीबाबत गोपनीयता ठेवण्यात येईल.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका